परिशिष्ट-३

महाराष्ट्र शासन

# सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग


**सहायक आयुक्त समाजकल्याण....**

(आपल्या कार्यालयाचा पूर्ण पत्ता द्यावा)

दूरध्वनी क्र. 0240-2402391 ई-मेल : spldswoaurangabad@yahoo.com


# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

## अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता अर्ज करणे. (६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच)

दिवसेंदिवस वाढत असलेली व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात राज्यात शासकीय वसतिगृहांची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे, वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवेशास मर्यादा येत आहेत. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ वसतिगृह सुरू करून तेथे प्रवेश देणे या बाबींवर जागेची उपलब्धता व बांधकामासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता मर्यादा येतात. अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरित करण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे. या योजनेसाठी विद्यार्थ्यांना १० वी/ १२वी/ पदवी/पदविका परीक्षेमध्ये

www.fijs.co.in

६०% पेक्षा जास्त गुण असणे अनिवार्य आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही गुणांची मर्यादा ५०% आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर (इयत्ता ११ वी, पदवी, पदव्युत्तर पदवी) शिक्षण घेण्यासाठी शासकीय वसतिगृहात प्रवेशित नसणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठी खालीलप्रमाणे रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वितरित करण्यात येईल.

| अ. क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरित 'क' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | उर्वरित ठिकाणी उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२००० | २८००० | २५००० |
| २ | निवास भत्ता | २०००० | १५००० | १२००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८००० | ८००० | ६००० |
| | एकूण | ६०००० | ५१००० | ४३००० |

टीप : वरील रकमेव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु. ५०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु. २०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरूपात देण्यात येईल.

- सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष, अटी व शर्ती अर्जासोबत जोडलेल्या आहेत. त्याचे विद्यार्थी व पालकांनी अवलोकन करावे. निकष, अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनीच अर्ज भरावेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जाचा विहित नमुना खालील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. संकेतस्थळ

www.fjs.co.in

: http://sisa.maharashtra.gov.in, http://www.maharashtra.gov.in

- अर्जाचा नमुना संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा आणि अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या यादीसह तो विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र ज्या जिल्ह्यातून काढलेले आहे त्या जिल्ह्याच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयामध्ये समक्ष/टपालाद्वारे/कार्यालयाच्या ई-मेलवर दि. १५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत दाखल करावा. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.
- अपूर्ण भरलेले आणि अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज रद्द समजण्यात येतील.
- ६०% पेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ५०% असेल.
- जिल्हानिहाय अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात किती विद्यार्थ्यांना हा लाभ द्यावयाचा ही संख्या निश्चित केलेली असून, त्यापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
- निवड यादी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयामार्फत प्रसिद्ध केली जाईल. निवड न झालेल्या विद्यार्थ्यांना वेगळे कळविण्यात येणार नाही.
- सदर अर्ज भरण्याची अखेरची मुदत दि. १५ नोव्हेंबर २०१७ पर्यंत असेल.

( )

**सहायक आयुक्त**

समाजकल्याण, औरंगाबाद

www.fjs.co.in